## प्रकरण – 3 रे

# स्वा. दादासाहेब उंडाळकरांचे राजकिय व स्वातंत्र्य चळवळीतील कार्य

## स्वा. दादासाहेब उंडाळकरांचे राजकिय आणि स्वातंत्र्य चळवळीतील कार्य

सन 1942 च्या ऑगस्ट क्रांतीचा संग्राम हा हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीतील अखेरचा लढा होता. "करेंगे या मरेंगे" या निर्धाराने भारतीय जनता या स्वातंत्र्य लढ्यात उतरली होती. या लढ्यामध्ये महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यानेही फार मोठी कामगिरी बजावली आहे. साताऱ्याच्या "प्रति सरकार" चळवळीने तर हिंदूस्थानच्या इतिहासात एक स्वतंत्र पर्व निर्माण केले आहे. देशप्रेम आणि स्वातंत्र्य प्राप्ती यांच्या प्रेरणेने भारावलेल्या सातारा जिल्ह्यातील व्यक्तींनी एक अलौकिक इतिहास घडविला आहे. नाना पाटील व त्यांच्या क्रांतीकारी सहकाऱ्यांनी स्थापन केलेल्या प्रति सरकारला केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर संपूर्ण हिंदूस्थानातून आणि इंग्लडच्या पार्लमेंटमध्येही प्रसिद्धी मिळाली. ब्रिटीश पार्लमेंट मध्ये विरोधी पक्षाचे खासदार "सातारा जिल्ह्यात नाना पाटील नावाच्या राजाने बंड करून राज्य स्थापन केले आहे. त्याचे काय?" असे प्रश्न विचारून ब्रिटीश पंतप्रधानांना छेडत होते. 1

1942 च्या चलेजाव आंदोलनात तन–मन–धन अर्पण करणाऱ्या सातारा जिल्ह्यातील स्वातंत्र्य सैनिकांची यादी खूप मोठी आहे. प्रत्येकाने आपआपल्या परीने स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केले. परंतू महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसेच्या तत्व ज्ञानावर श्रद्धा ठेवून स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला झोकून देणारे कराड तालुक्यातील उंडाळे गांवचे धडाडीचे शेतकरी बाळकृष्ण आनंदराव पाटील उर्फ दादासाहेब उंडाळकर यांचे स्वातंत्र्य चळवळीतील कार्य असामान्य असे आहे. तसेच त्या काळात सातारा जिल्हा हा ब्रिटीश धार्जीन्या कूपर गटाचा बालेकिल्ला होता. जिल्ह्यातील राजकारणावर त्यांचे जबरदस्त वर्चस्व होते. राजसत्ता, अर्थसत्ता आणि प्रतिष्ठा या

सर्व गोष्टी कूपरच्या हातामध्ये एकवटल्या होत्या. त्यामुळे त्या काळात सातारा जिल्ह्यामध्ये काँग्रेसला सामर्थ्य मिळू शकत नव्हते. 2 तेव्हा ब्रिटीश धार्जिन्या कूपरचे जिल्ह्यातील राजकिय वर्चस्व मोडून काढण्यासाठी दादांनी केलेले कार्य अतिशय महत्वाचे आहे. म्हणून दादांच्या राजकिय व स्वातंत्र्य चळवळीतील कार्याचा आढावा घेणे गरजेचे आहे.

*****

12769
A

## दादांचे राजकिय कार्य

### 1) दादांचा राजकिय पिंड :

सातारा जिल्हा हा मूळातच राजकिय दृष्ट्या जागृत असलेला जिल्हा आहे. लोकमान्य टिळकांच्या काळात दादासाहेब करंदीकर, पांडू आण्णा शिराळकर, दादासाहेब आळतेकर इत्यादी पुढारी या जिल्ह्यात होऊन गेले. पण गांधीजींच्या काळात हे नेतृत्व अनेकांनी पुढे नेले. 2 त्यामध्ये दादासाहेब उंडाळकर हे एक होत.3 दादांची म. गांधीच्या सत्य, अहिंसा या तत्वज्ञानावर फार मोठी श्रद्धा होती. तसेच काँग्रेसबद्‌दलही त्यांच्या मनात प्रेम होते. काँग्रेसचे ते निष्ठावंत कार्यकर्ते होते. काँग्रे शिवाय देशाला तरणोपाय नाही अशी त्यांची ठाम समजूत होती. ग्रामीण भागातील जनतेमध्ये त्यांनी तसा प्रचार केला होता. दादा स्वतः खादीधारी होते व इतरांनाही ते खादी वापरणेस सांगत असत. त्यांनी काँग्रेसवर निष्ठा आणि गांधीजींच्या विचारावर श्रद्धा ठेवली आणि काँग्रेसचा विचार घरोघरी पोहचविण्यासाठी मनःपूर्वक प्रयत्न केले.

### 2) दादांचा राजकारणात प्रवेश :

दादांना राजकारणात तसेच स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याची प्रेरणा हरीभाऊ घोडके या ब्राम्हण सर्कल इन्स्पेक्टर कडून मिळाली 4 त्यांच्या प्रेरणेमुळेच ते राजकारणात सक्रीय सहभागी झाले. त्याचप्रमाणे भाऊसाहेब सोमण वकील, दादासाहेब आळतेकर, पांडू तात्या डोईफोडे यांच्याही विचारांचा प्रभाव दादांच्यावर पडलेला होता असे दिसून येते. त्यावेळी सातारा जिल्हा काँग्रेसचे प्रमुख नेते भाऊसाहेब सोमण वकील हे होते. या सर्वांच्या बरोबर तसेच वामनराव फडके वकील, यशवंतराव

चव्हाण, व्यंकटराव पवार इत्यादी कॉंग्रेस कार्यकर्त्यांबरोबर दादा कॉंग्रेसचे कार्य करू लागले. 5

दादांनी राजकारणात प्रवेश केल्यानंतर त्यांनी कॉंग्रेसचे सामर्थ्य ग्रामीण भागात वाढविण्यासाठी फार प्रयत्न केले. त्यासाठी सातारा जिल्ह्यातील ब्रिटीश धार्जिन्या कूपर गटाचे राजकिय वर्चस्व संपविण्यासाठी त्यांनी 1932 ची जिल्हा लोकल बोर्डाची निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला आणि ते निवडूनही आले. नंतर त्यांनी हळू–हळू जिल्ह्यातील राजकारणातून कूपर गटाचे वर्चस्व कायमचे नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले.

### 3) दादांचे जिल्हा लोकल बोर्डातील कार्य व त्यांनी कूपरचे वर्चस्व संपविण्यासाठी केलेले प्रयत्न :

1922 ते 1937 या काळात सातारा जिल्ह्यातील राजकारणावर कूपर हया ब्रिटीश धार्जिन्या कारखानदाराचे वर्चस्व होते. त्या काळात कूपर ही सातारा जिल्ह्यातील फार मोठी शक्ती होती. त्यांच्या बद्दल असे म्हटले जात होते की, कूपरच्या भरधाव धावणाऱ्या गाडीची धूळ जरी आपणांवर पडली तरी लोक स्वतःला धन्य समजत होते. कूपर हे मोठे कारखानदार होते. जिल्ह्यातील दारूच्या दुकानांचे लिलाव देण्याची सत्ता त्यांच्या हातात होती. जिल्ह्याचे कलेक्टर, राज्याचे गव्हर्नर यांच्याकडे त्यांचे मोठे वजन होते. थोडक्यात सातारा जिल्ह्यातील राजसत्ता, अर्थसत्ता व प्रतिष्ठा या सर्व गोष्टी कूपरच्या हातामध्ये एकवटल्या होत्या. कूपरच्या राजकिय व आर्थिक वर्चस्वामुळे सातारा जिल्ह्यात महात्मा गांधीच्या स्वातंत्र्य लढ्याला मोठे सामर्थ्य मिळू शकत नव्हते. 6

अशा परिस्थितीत दादांनी ब्रिटीश धार्जिन्या कूपरचे सातारा जिल्ह्यातील राजकिय वर्चस्व संपविण्याचा निश्चय केला. ब्रिटीश साम्राज्यशाहीचे एक प्रतिक म्हणून असलेला सातारा जिल्ह्यातील कूपरचा बुरूज ढासळून टाकला पाहिजे अशी त्यांची त्या काळात भूमिका होती. या दृष्टीने 1932 ची जिल्हा लोकल बोर्डाची निवडणूक लढविण्याचा दादांनी निर्णय घेतला. 7 ही निवडणूक अत्यंत चूरशीची झाली. या निवडणूकीत दादांच्या विरूद्ध कूपर गटाचे आण्णाप्पा नारायण कल्याणी, रा. काळे, ता. कराड हे निवडणूक लढवित होते. त्यांच्या पाठीशी राजसत्तेची आणि अर्थसत्तेची फार मोठी ताकद होती. दांदाच्याकडे यापैकी काहीही नव्हते. पण त्यांच्या पाठीमागे मतदार होते. या निवडणूकीत दादांचा प्रचंड विजय झाला.

यानंतर दादांनी जिल्हा लोकल बोर्डात कूपर गटाचा एक–एक सदस्य फोडून त्यातून श्री. विठ्ठलराव देशमुख – माहुलीकर, श्री. विठ्ठलराव पाटील – विटेकर, श्री. काकासाहेब चोरेकर, श्री. बाबासाहेब आरवाडकर यांचा एक गट तयार केला. आणि जिल्हा लोकल बोर्डाच्या अध्यक्षपदी काकासाहेब चोरेकर यांची निवड करण्यांत आली. तसेच शिक्षण समितींच्या चेअरमनपदी वाईचे आर.एन. भावे (वकील) यांची निवड करण्यांत आली. 8 अशा पद्धतीने दादांनी सातारा जिल्ह्याच्या राजकारणातून कूपरचे वर्चस्व संपविण्याचा प्रयत्न केला.

यानंतर 1935 च्या निवडणूकीतही दादा जिल्हा लोकल बोर्डात निवडून आले. त्या ठिकाणी लोक प्रतिनिधी म्हणून काम करीत असताना दादांनी अनेक लोकोपयोगी सार्वजनिक हिताची कामे केली. त्यामध्ये दळण–वळणासाठी रस्ते, पाण्यासाठी विहीरी, धर्मशाळा, प्राथमिक शाळांच्या इमारती, ग्रामीण आरोग्य केंद्रे इ. कामांचा

समावेश करता येईल. जिल्हा लोकल बोर्डात काम करीत असताना आपल्या तालुक्याचा सर्वांगीण विकास कसा करता येईल हा एकच ध्यास दादांना होता. 9

## 4) दादा व राज्य विधानसभा निवडणूका :

1935 च्या भारत विषयक सुधारणा कायद्याअन्वये भारतातील राज्य विधान सभांच्या निवडणूका 1936 साली झाल्या. या निवडणूकीमध्ये सार्वत्रिक मतदानाचा हक्क नव्हता. तर कर व शेतसारा यावर आधारित फार थोडया लोकंना मतदानाचा हक्क मिळालेला होता. या निवडणूकीत दक्षिण सातारा जिल्ह्यातून चार उमेदवार निवडून द्यावयाचे होते. या निवडणूकीसाठी द. सातारा जिल्ह्यातून कॉंग्रेसने पुढील चार उमेदवार उभे केले होते.

1) आत्माराम नाना पाटील (बोरगांव)
2) पांडू आण्णा शिराळकर (शिराळा)
3) भाऊसाहेब कुदळे (बागणी)
4) आचरेकर वकील **10**

कॉंग्रेसच्या या चार उमेदवारांच्या प्रचारासाठी स्वतः पंडीत जवाहरलाल नेहरू कराडला आले होते. त्यावेळी त्यांची प्रचंड सभा कराडला कृष्णा घाटावर झाली होती. या सभेला ग्रामीण भागातून हजारोंच्या संख्येने लोक उपस्थित होते, असे म्हंटले जाते. असे असूनही या निवडणूकीत कॉंग्रेसचे दोनच उमेदवार विजयी झाले. ते म्हणजे आत्माराम नाना पाटील (बोरगांव) व पांडू आण्णा शिराळकर (शिराळा) हे होत. दादांनी कराड येथील त्यावेळचे बहुजन समाजातील सुशिक्षित कर्तबगार असे कॅप्टन शंकरराव मोहिते यांना निवडणूकीसाठी उभे केले व त्यांचा प्रचार करून त्यांना निवडूनही आणले. **11**

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

या निवडणूकीत कूपर गटाचे उमेदवार श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी हे सुद्धा निवडून आले. थोड्याच दिवसांनी श्री. शंकरराव मोहिते यांना मोठी नोकरी मिळाल्याने त्यांनी आमदार पदाचा राजीनामा दिला. त्या जागी काँग्रेसचे श्री. चंद्रोजी पाटील (कामेरीकर) हे बिनविरोध निवडून आले. 12.

थोडक्यात या निवडणूकीतही दादांनी सातारा जिल्ह्याच्या राजकारणातून ब्रिटीश धार्जिण्या कूपरचे वर्चस्व पूर्णपणे नष्ट करण्याचा प्रयत्न केला. दादांचे हे कार्य महाराष्ट्रातील स्वातंत्र्य लढ्याच्या दृष्टीनेही महत्वाचे आहे.

5) <u>दादांचे काँग्रेसमधील कार्य</u> :

1935 च्या भारत विषयक सुधारणा कायद्याने 1936–37 ला प्रांतिक विधानसभांच्या निवडणूका झाल्या. मुंबई विधानसभा निवडणूक प्रचारात दक्षिण सातारा जिल्ह्यातील काँग्रेसचे उमेदवार तसेच स्वतंत्र उमेदवार शंकरराव मोहिते यांच्यासाठी दादांनी आस्थापूर्वक प्रचार केला. या निवडणूकीत काँग्रेसला बहुमत मिळाले. मुंबईसह इतर आठ प्रांतातही काँग्रेसची मंत्रीमंडळे आली, त्याचा दादांना फार आनंद झाला.

सन 1939 साली दुसरे जागतिक महायुद्ध सुरू झाले. हिटलर व मुसोलिनी यांच्या रूपाने जगापुढे हुकूमशाहीचा धोका उत्पन्न झाला. तेव्हा 27 जुलै, 1940 रोजी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने एक ठराव संमत करून युद्ध प्रयत्नात सरकारला सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. तथापि, सरकारने भारतीय स्वातंत्र्याच्या संबंधी स्पष्ट शब्दात घोषणा करावी अशा काही अटी काँग्रेसने घातल्या. या अटी संदर्भात ब्रिटीश

सरकारने कोणतीही ठाम भूमिका घेतली नाही. तेव्हा महात्मा गांधीनी ऑक्टोबर 1940 मध्ये वैयक्तीक सत्याग्रहाची मोहिम सुरू केली. त्यासाठी पहिले सत्याग्रही म्हणून विनोबा भावे यांची निवड केली. ब्रिटीश सरकार भारताच्या स्वातंत्र्या संबंधी स्पष्ट भूमिका घेत नाही हे पाहून कॉंग्रेसच्या मंत्रीमंडळानी राजीनामे दिले आणि आपली भूमिका जनतेला समजावून सांगण्याचे कार्य हाती घेतले. 13

याच संदर्भात कराड तालुक्यात उंडाळे गावी कॉंग्रसने सभा आयोजित केली होती. त्यावेळी कराड तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष ग.स. आळतेकर हे होते. या सभेचे अध्यक्षस्थान कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते काकासाहेब गाडगीळ यानी भूषविले होते. त्यावेळी त्यांची 'अनेक बैलजोड्या जोडलेल्या सुशोभित बैल-गाडीतून वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढली होती. असे म्हणतात. या सभेचे संपुर्ण नियोजन दादांनी केले होते. या सभेचे कामकाज पूर्णपणे यशस्वी झाले याचे सारे श्रेय दादांना दिले जाते. 14

कॉंग्रेसचे कार्य दादा मोठ्या उत्साहाने आणि तळमळीने करीत असत. सन 1940 मध्ये दादांनीही वैयक्तिक सत्याग्रहासाठी परवानगी मिळावी म्हणून प्रयत्न केला. परंतू कॉंग्रेसकडून त्यांना परवानगी मिळाली नाही. कॉंग्रेसचे कार्य व ध्येय-धोरण कराड तालुक्यातील सर्व-सामान्य ग्रामीण जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी दादांनी फार कष्ट घेतले. उंडाळे परिसरात राष्ट्रीय चळवळीचे आणि सार्वजनिक सेवेचे जे कार्य उभे राहिले त्याचे बहुतांशी श्रेय दादासाहेब उंडाळकर यांना आहे.

दादांनी उंडाळे परिसरात राजकिय कार्यकर्त्यांची नवीन तरूण पिढीही निर्माण केली. या परिसरातील प्रत्येक गावातून आपल्या इत्तंभूत माहितीच्या आधारे त्या

गावातील तरूण, धाडसी, निस्वार्थी व ज्याची आर्थिक स्थिती बऱ्यापैकी आहे, अशा व्यक्तिला दादा राजकिय व सामाजिक कार्यासाठी प्रवृत्त करीत असत. त्यातूनच श्री. मारूतीराव शेवाळे – घोगांव, कै. महादू पाटील – टाळगांव, श्री. हसन भाई – म्हासोली, श्री. वसंतराव जिंतीकर, श्री. बापूराव पाटील – शिरंबे, असे अनेक कार्यकर्ते प्रत्येक गावात दादांनी तयार केले. वेळोवेळी त्यांच्याशी संपर्क साधून त्यांना मार्गदर्शन केले. त्यांना नविन विचारांची दिशा दिली. त्यांचे काही चुकल्यास त्यांना खडसाविण्यासही कमी केले नाही. अशा प्रकारे दादांनी ओंड–उंडाळे परिसरात कार्यकर्त्यांचे मोहळ तयार केले, असे म्हणता येईल. 15

## स्वातंत्र्य चळवळीतील कार्य

शेतकरी कुटूंबात जन्मास आलेला दादांच्या सारखा मुलगा असे कोणालाही पुढे मोठेपणी ब्रिटीश सत्तेला टक्कर देईल असे कोणालाही वाटले नसेल पण स्वातंत्र्य आंदोलनाच्या झंझावती वाऱ्यामुळे दादांचा लढाऊ आत्मा भारत मातेच्या पायातील पारतंत्र्याच्या शृंखला तोडून टाकण्यासाठी प्रसंगी प्राणाचे मोल देण्यासाठी सिध्द झाला. स्वभावतःच दादांचे जीवन समाज व देश या दोन केंद्रबिंदू भोवती फिरत होते. त्यातच गांधीजीच्या आचारांची व विचारांची त्यांच्या मनावर एवढी जबरदस्त पकड बसली की 1942 च्या चलेजाव आंदोलनामध्ये त्यानी स्वतःला झोकून दिले या आंदोलनामध्ये सातारा जिल्ह्याने जो अभूतपर्व असा लढा दिला त्या महान लढयाचे दादा प्रमूख नेते होते.

दादा सन 1928 च्या सुमारास महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्य लढयाच्या चळवळीकडे आकृष्ट झाले. **16** स्वातंत्र्य चळवळीत शहरी भागातील सुशिक्षित मध्यम वर्गातील तरुण मोठया प्रमाणावर सहभागी झाले होते. परंतू महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागातून विशेषतः शेतकरी कुटूंबातून हाताच्या बोटावर मोजण्या इतके तरुण स्वतंत्र आंदोलनात सहभागी झाले. त्या तरुणांमध्ये दादांचा आर्वजून उल्लेख करावा लागेल.

### 1) <u>दादासाहेब उंडाळकर व 1942 चे चलेजाव आंदोलन</u>

सन 1939 साली दुसरे जागतिक महायुध्द सुरु झाले. या युध्दात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची इंग्लडला व त्याच्या दोस्त राष्ट्राच्याप्रति सहानुभूती होती. कारण हिटलर व मुसोलिनी यांच्या रुपाने जगापुढे जो हुकूमशाहीचा धोका निर्माण झाला होता

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

त्यास कॉंग्रेसच्या नेत्यांचा विरोध होता. तेव्हा 27 जुलै 1940 रोजी कॉंग्रेसने एक ठराव संमत करुन युध्द प्रयत्नात ब्रिटीश सरकारला सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. तथापि सरकारने भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नासंबधी स्पष्ट शब्दात घोषणा करावी व राष्ट्रीय पातळीवर हंगामी सरकारची स्थापना करावी या अटी कॉंग्रसने घातल्या. या अटीच्या संदर्भात सरकारने कोणतीही ठाम भूमिका घेतली नाही. दरम्यान भारतीय राजकारणात निर्माण झालेला पेचप्रसंग सोडविण्यासाठी ब्रिटीश सरकारचे एक प्रतिनिधी सर स्ट्रॅफर्ड क्रिप्स हे नवीन योजना घेवून मार्च 1942 मध्ये भारतात आले. परंतू या योजनेत कोणत्याही भरीव तरतूदी नसल्याने भारतीय नेत्यांनी ही योजना फेटाळून लावली. क्रिप्स शिष्टाईला अपयश आल्यानंतर मात्र गांधीजी व कॉंग्रेसचे अन्य नेते सरकार विरुंध्द नव्याने आंदोलन करण्याच्या निर्णयात येऊन पोहचले. अशा पार्श्वभूमीवर भारतीय स्वातंत्र्याच्या संबधी काही तरी हालचाल करणे कॉंग्रेस नेत्यांना आवश्यक वाटले. त्यानुसार जुलै 1942 मध्ये कॉंग्रेसच्या वर्किंग कमिटीची बैठक घेण्यात आली. त्यानंतर ऑगस्ट 1942 मध्ये कॉंग्रेसचे अधिवेशन मुंबई येथे भरले. या अधिवेशनात 8 ऑगस्ट 1942 रोजी कॉंग्रेसने "चलेजाव चा" ठराव बहुमताने मंजूर केला. या अधिवेशनात असाही निर्णय घेण्यात आली की इंग्रजानी जर भारतातील आपली सत्ता सोडली नाही तर कॉंग्रेसने गांधीजीच्या नेतृत्वाखाली जन आंदोलन सुरु करावे. गांधीजीनी हा निर्वाणीचा झगडा आहे असे जाहिर करुन "करेंगे या मरेंगे" या निश्चयाने हा अंतिम लढा सुरु करण्याचा जनतेला आदेश दिला. ब्रिटीशानीही कॉंग्रेसचे हे आव्हान स्वीकारुन दडपशाहीचे तंत्र अवलंबिले. 9 ऑगस्ट 1942 रोजी गांधीजीसह कॉंग्रेसच्या 148 नेत्याना अटक केली. कॉंग्रेस नेत्याना अटक केल्याबरोबर चळवळ थांबेल असे ब्रिटीश सरकारला वाटत होते.

परंतू त्यांचा अंदाज साफ चुकीचा ठरला. काँग्रेस नेत्यांच्या मार्गदर्शनाशिवाय जनतेने सर्व देशभर उत्स्फुर्त आंदोलन सुरु केले. प्रचंड मोर्चे निदर्शने निघू लागली. सर्व देश हिंसा–अहिंसेचा विचार न करता या आंदोलनात सामिल झाला. 17

सातारा जिल्ह्यातील जनतेने महात्मा गांधीच्या आदेशाला उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. मुंबईतील काँग्रेसच्या अधिवेशनाला सातारा लिल्ह्यातील अनेक प्रतिनिधी उपस्थित होते. त्यामध्ये व्यंकटराव पवार, यशवंतराव चव्हाण, काशिनाथ देशमुख (तांबवे), बापूराव कचरे (बुध पाचेगाव) भाऊसाहेब सोमण–वकील, पांडु आण्णा शिराळकर, किसनवीर, भाऊसाहेब बटाणे, कासेगावकर वैदय इ, प्रमुख होते. या मंडळीनी गांधीजींचा संदेश जिल्ह्यातील सर्व सामान्य जनते पर्यंत पोहचविला. 18

देशातील इतर भागाप्रमाणेच सातारा जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यांच्या अटकेबाबत तीव्र प्रतिक्रया उमटली. सर्व सामान्य जनतेते ब्रिटीश सरकार विरुध्द तीव्र असंतोष निर्माण झाला. सातारा जिल्ह्यातील काँग्रेस नेत्यानी चलेजाव चळवळ चालू ठेवण्याचा निश्चय केला. चळवळीचा पहिला कार्यक्रम म्हणून तालुक्यात मोर्चे काढण्याचे ठरविण्यात आले. या कार्यकमाचे प्रमुख सूत्रधार यशवंतराव चव्हाण हे होते. त्यानूसार पहिला मोर्चा कराडच्या मामलेदार कचेरीवर काढण्याचे ठरले. त्यासाठी तालुक्यातील प्रमुख कार्यकर्त्यांची पहिली बैठक बेलवडे येथे बोलविण्यात आली. या बैठकीमध्ये मोर्च्याबाबत तपशिलवार चर्चा करण्यात आली व संपुर्ण तालुक्यात मोर्च्यासंबंधी जनजागृती करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार मसूर भागात राघू आण्णा लिमये, विष्णू मास्तर, इंदोली भागात दिनकरराव निकम, ओंड–उंडाळे–काले भागात दादासाहेब उंडाळकर, किवळ भागात भिकू नाना साळुंखे, चरेगाव–उंब्रज भागात पांडुरंग पुजारी, कराड भागात माधवराव जाधव इ.अनेक कार्यकर्त्यांनी लोकांच्यामध्ये

जागृती निर्माण केली. 24 ऑगस्ट 1942 रोजी कराडच्या मामलेदार कचेरीवर मोर्चा काढण्याचे निश्चित करण्यात आले. यशवंतराव चव्हाण भूमिगत राहून मोर्च्यासंबंधी कार्यकर्त्यांच्या मध्ये संपर्क साधून मार्गदर्शन करीत होते. 19

## 2) 24 ऑगस्ट 1942 कराड मामलेदार कचेरीवर पहिला मोर्चा नेतृत्व – दादासाहेब उंडाळकर

24 ऑगस्ट 1942 च्या पहिल्या मोर्च्यामुळे कराड तालुक्यातील जनतेमध्ये जागृती निर्माण झाली होती. या मोर्च्याचे नेतृत्व काँग्रेसचे धडाडीचे व ध्येयवादी कार्यकर्ते दादासाहेब उंडाळकर यानी करावे असा कार्यकर्त्यांनी एकमताने निर्णय घेतला व तसा निरोप घेऊन बाबुराव कोतवाल दादांचकडे उंडाळयाला गेले. दादानी मोर्च्याचे नेतृत्व करण्याचे मान्य केले. दादा म्हणजे गावचा आधार, प्रौढ व विचाराने पोक्त असे संयमी व धीराचे व्यक्तिमत्व होते.

24 ऑगस्ट 1942 रोजी दादा ओंड–उंडाळे–काले–शिरंबे भागातील हजारो लोकांसह शिंग–तुता–या इ. वादयाच्या गजरात मोर्च्यासाठी कराडला आले. दिनकरराव निकम (इंदोली, राघू आण्णा लिमये (मसूर), विष्णू मास्तर (निगडी), भिकू नाना साळुंखे (किवळ), पांडुरंग पुजारी (चरेगाव), सिताराम गरुड इ. अनेक कार्यकर्ते आपल्या लोकांसह मोर्च्यासाठी कराडला आले होते. त्याचबरोबर कासेगावकर वैदय, सदाशिवराव पेंढारकर, माधवराव जाधव इत्यादीनी उसळत्या रक्ताची तरुण सेना कराडमध्ये सज्ज ठेवली होती. 20 या मोर्चासाठी खेडो–पाडीचे शेतकरी कामकरी असे सुमारे सात हजार लोक जमले होते असे समजते. ढोल, शिंग, तुता–या इ. वादयांसह घोषणा देत दादांच्या नेतृत्वाखाली हा मोर्चा निघाला. त्यावेळी वालावलकर हा कडवा पोलीस अधिकारी कराडचा ठाणेदार होता. 21

मोर्चा मामलेदार कचेरीसमोर आला त्यावेळी कचेरीचे फाटक बंद होते. भोवती लाठीधारी पोलीसांचा पहारा होता. दादा तिरंगा झेंडा हाती घेऊन कचेरीच्या आवारात शिरले. त्यानी कचेरीवर झेंडा लावण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांना व त्यांच्या बरोबरच्या काही लोकांना अटक झाली. त्यानंतर पोलीसानी जमावावर लाठीहल्ला केला तेव्हा लोक बिथरण्याची शक्यता होती. अशावेळी मोर्च्याचे नेतृत्व करणारे दादा जमावापुढे उभे राहीले. त्यावेळी मोठया आत्मविश्वासाने दादांनी तेथे जे भाषण केले त्याची ऐतिहासिक नोंद महाराष्ट्र शासनाच्या गृहखात्याच्या खास पत्रात आढळते यावेळी दादा म्हणाले की –

"आपला मोर्चा यशस्वी झाला आहे. विजय आपलाच झाला आहे. आता आपण शांतपणे परत फिरा. जे आपणास अटक करु इच्छितात त्यांनाच अटक करण्याइतपत आपण या घटकेला सामर्थ्यवान आहोत. पण तो या मोर्च्याचा उद्देश नाही. मला झालेली अटक मी स्विकारलेली आहे. "करा किंवा मरा" हा गांधीजींचा संदेश आहे. पण त्याचबरोबर त्यानी अहिंसेचे पालन करण्याबद्दलही बजावलेले आहे. आज जर आपण हिंसाचारी कृत्य केले तर ते महात्माजींना आवडणार नाही. उलट त्यांना अतिशय दुःख होईल म्हणूनच तुम्ही शांततेने परत जा. स्वातंत्र्याचा लढा गांधीजींच्या मार्गाने पुढे चालवा" 22

दादांच्या भाषणाचा जमावावर इतका प्रभाव पडला की त्यानी आपल्या नेत्याचा आदेश मानला व लोक अत्यंत शांततेने व शिस्तीने आप–आपल्या घरी परत गेले. दादांचे भाषण जणू काही गांधीजींच्या नावाने घेतलेली शपथच होती.

कराड मामलेदार कचेरीवर हा जो मोर्चा निघाला होता तो महाराष्ट्रातील

शेतकऱ्यांचा, कामकऱ्यांचा तसेच सर्व जाती-धर्माच्या लोकांनी अहिंसेचा मार्गाने गांधीजींच्या विचाराची प्रेरणा घेऊन काढलेला पहिला मोर्चा होय. या मोर्च्यात स्त्रियाही सहभागी झाल्या होत्या. महाराष्ट्रात फक्त हाच मोर्चा अहिंसेच्या मार्गाने यशस्वी झाला. इतर ठिकाणच्या मोर्च्यात त्यात अनेक लोक ठार झाले. या मोर्च्यानंतर अनेक ठिकाणी मोर्चे निघाले व लोकांमध्ये एक प्रकारची चैतन्याची भावना व ब्रिटीश, ब्रिटीश गुलामगिरीतून बाहेर पडण्याची अधिक उत्साही प्रेरणा निर्माण झाली. 23

या मोर्च्यानंतर दादासाहेबांना अटक झाली. व येरवडा येथे सात महिने त्याना कारावास भोगावा लागला 24 तिथे त्याना आचार्य जावडेकर, आचार्य भागवत, युसूफ मेहेरअली, स.का.पाटील, तुळशीदास जाधव, मामा देवगिरीकर, पेणचे इतिहास प्रेमी प.रा.दाते, कराडचे बाबुराव गोखले यांची बौध्दिके ऐकण्याची चांगली पर्वणी घडली 25

## 3. दादा गांधीजींचे खरे-खुरे अनुयायी

दादासाहेब उंडाळकर खऱ्या अर्थाने गांधीजींचे सच्चे अनुयायी होते. त्याचा प्रत्यय स्वामी रामानंद भारती यांची सभा येळगाव ता.कराड येथे असे समन्त होती. त्यावेळी आला तो काळ 1944 चा असावा. 1942 पासून सतारा जिल्ह्यात प्रतिसरकारचे आंदोलन सुरु झाले होते. इंग्रज सरकारला हे प्रतिसरकार मोडून काढता आले नव्हते कारण ती जनतेची चळवळ होती. सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकार दडपशाही मार्गाने चिरडून टाकण्यासाठी सरकारने गिलबर्ट नावाच्या एका जुलमी पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. 26 त्याची त्या काळात जिल्ह्यामध्ये फार मोठी दहशत होती असे म्हणतात. तेव्हा येळगाव येथील स्वामी रामानंद भारती यांची सभा

कोणत्याही परिस्थितीत होऊ दयायची नाही असा त्याने निर्धार केला होता त्यासाठी त्याने कडेकोट पोलीस बंदोबस्त कडेकोट ठेवला होता. सभा सुरु होण्याच्या वेळी स्वामी रामानंद भारती - दादा उंडाळकर तेथे पोहचले तेव्हा तेथे प्रचंड जमाव गोळा झालेला होता असे दिसून आले. गिलबर्ट थोडया वेळातच सभास्थानी आला. त्यावेळी तो संतापाने लालबुंद झाला होता. सभेत कोणत्या क्षणी काय घडेल याचा भरोसा वाटत नव्हता. अशा वेळी गिलबर्ट याच्या परतीच्या रस्त्यावर लोकांनी दगड ठेवून त्याचा परतीचा रस्ता बंद केला होता. हे समजताच तो आणखी भडकला. रस्ता बंद कोणी केला त्यांची नावे आपल्याला समजली पाहिजेत असा आग्रह त्याने धरला. स्वामी रामानंद भारती यानी त्याप्रमाणे सभेला आवाहन केले परंतू कोणीही पुढे आले नाही. कोणीच पुढे येत नाही असे पाहून दादानी सभेला आवाहन केले त्यावेळी दादा म्हणाले "आपण सर्वजण गांधीजींचे अनुयायी आहोत. खरा सत्याग्रही निर्भय असतो. तो कसल्याही परिणामाला भीत नाही. आपण जर निर्भयता सोडली तर तो गांधीजींच्या विचारांचा पराभव आहे. याचा अर्थ आपण खरे-खुरे सत्याग्रही नाही

27

दादांच्या या आवाहनानंतर पाच-सहा तरुण पुढे आले. आणि रस्ता अडविण्याचे काम आम्ही केले आहे असे त्यानी सांगितले. दादांच्यावर त्या काळात सामान्य लोकांची किती विलक्षण भक्ती होती आणि दादा गांधीजींच्या विचाराचे कसे पक्के अनुयायी होते त्याचे हे बोलके उदाहरण आहे.

**समारोप**

उंडाळे गावचे स्वातंत्र्य सैनिक बाळकृष्ण पाटील उर्फ दादासाहेब उंडाळकर यांचे स्वातंत्र्य लढयातील कार्य फार मोलाचे आहे. तसेच त्यांचे राजकीय कार्यही

महत्वाचे आहे. राजसत्ता व अर्थसत्ता यांचा वरद्हस्त असलेल्या ब्रिटीश धार्जिण्या कूपर गटाचे सातारा जिल्ह्यातील राजकारणावर असलेल वर्चस्व कायमचे नष्ट करण्याचा प्रयत्न दादांनी केला. स्वातंत्र्य चळवळीच्या बाबतीत जा पर्यंत ग्रामीण जनता स्वातंत्र्य आंदोलनात सामील होत नाही तो पर्यंत आंदोलनाची तीव्रता वाढणार नाही. अशी त्यांची ठाम समजूत होती. म्हणून त्यानी आपल्या भागात अनेक सभा घेतल्या. लोकांच्याबरोबर चर्चा केल्या व ग्रामीण भागातील जनतेत निर्माण केली. 1942 च्या लढयात कराड मामलेदार कचेरीवर निघालेल्या विराट शेतकरी मोर्चाचे त्यानी निधडया छातीने नेतृत्व केले. त्या मोर्च्यावर लाठीमार झाला व दादांना अटकही झाली. त्यानी अटक शांतपणे स्वीकारली व मोर्च्यातील लोकांना कोणतेही हिंसाचारी कृत्य न करता गांधीजींच्या मार्गाने हा लढा पुढे चालवा असे सांगितले. थोडक्यात गांधीजींच्या सत्य–अहिंसा या तत्वावर दादांची नितांत श्रध्दा होती व त्या तत्वांचे ते निष्ठेने पालन करणारे होते असे दिसून येते. दादा शेतकऱ्यांचे आधारस्तंभ होते. ग्रामीण प्रश्नाबाबत आस्था व कळकळ असलेला हा नेता स्पष्ट विचारांचा आणि संघटन् कुशल होता असे म्हणता येईल.

## संदर्भ


1. पाटील रा.तु.,सांगली – सातान्याचे राजकारण पृ 37

2. डॉ.मंगुडकर मा.प

ध्येयवादी स्वातंत्र्य सेनानी–दादा उंडाळकर

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ 27

3. स्वा.दादा उंडाळकर स्मरणिका समिती

संपादकीय, स्मरणिका – 1973

4. पाटील जयसिंगराव बाळकृष्ण

मुलाखत दि. 21.4.94 ठिकाण – उंडाळे

5. नावलीकर सदाशिव गोपाळ स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 20.5.94 ठिकाण – कराड

6. डॉ.मंगुडकर मा.प. ध्येयवादी स्वातंत्र्य – सेनाना

दादा उंडाळकर संपादक–विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वतातून परिवर्तनाकडे पृ 27

7. कित्ता

8. नावलीकर सदाशिव गोपाळ स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 20.5.94 ठिकाण – कराड

9. कित्ता

10. कित्ता

11. कित्ता

12. पाटील रा.तु.

सांगली – साताऱ्याचे राजकारण पृ 33

13. पवार जयसिंगराव

हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास पृ 269

14. आळतेकर ग.स.

एक निष्ठावान व तळकळीचा कार्यकर्ता

संपादक–विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ 16

15. नावलीकर सदाशिव गोपाळ स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 20.5.94 ठिकाण – कराड

16. डॉ.मंगुडकर मा.प. पृ. 28

ध्येयवादी स्वातंत्र्य सेनानी – दादा उंडाळकर

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

17. गायकवाड, थोरात, पाटील, भिडे

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास पृ 273

18. नावलीकर सदाशिव गोपाळ स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 20.5.94 ठिकाण – कराड

19. माने व्यंकटराव स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 22.5.94 ठिकाण – उंब्रज

20. पाटणे संभाजीराव

स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा पृ 42

21. थोरात संभाजीराव

"दूरदृष्टीचा राष्ट्रवादी"

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ 19

22. महाराष्ट्र शासन गृहखाते, पोलिटिकल स्पेशल ब्रँच

(3) 1945/46 बी क्लास मधील मजकूर

23. पाटणे संभाजीराव

स्वातंत्र्य संग्रामातील सातारा जिल्हा पृ 44

24. नावलीकर सदाशिव गोपाळ स्वातंत्र्य सैनिक

मुलाखत दि. 20.5.94 ठिकाण – कराड

25. बॅ.पाटील पी.जी.

ओजस्वी, साक्षेपी – क्रांतीकारक

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ 11

26. पाटील दिनकररांव बाळकृष्ण

कल्पवृक्ष आम्हासाठी लावूनिया दादा गेले !

संपादक – विठ्ठल पाटील, डॉ.कन्हैया कुंदप

क्रांतीपर्वातून परिवर्तनाकडे पृ 22

27. कित्ता